संगणक विभाग/ २९९८ / २०२५

मुंबई नगर दिवाणी व सत्र न्यायालय,

जुने सचिवालय आवार,

मुंबई — ४०० ०३२

दिनांक : २९.१०.२०२५

**नादुरुस्त शासकीय संगणकाचे सुट्टे भाग (मॉनिटर, सी.पी.यु, डॉट मॅक्ट्रीस प्रिंटर, लॅन स्वीचेस, टोनर व युपीएस बॅटरी) यांच्या जाहिर लिलावाबाबतच्या अटी व शर्ती.**

मुंबई नगर दिवाणी व सत्र न्यायालयाच्या कार्यालयातील नादुरुस्त शासकीय संगणकाचे सुट्टे भाग (मॉनिटर, सी.पी.यु, डॉट मॅक्ट्रीस प्रिंटर लॅन स्वीचेस, टोनर व युपीएस बॅटरी) जेथे आहे त्या स्थितीत जाहीर लिलाव पध्दतीने विक्री करण्यात येणार आहे.

सदर जाहीर लिलाव दिनांक १०.११.२०२५ रोजी मुंबई नगर दिवाणी व सत्र न्यायालय, जुने सचिवालय इमारत, मुंबई — ४०० ०३२, या आवारात खालील अटी व शर्तीनुसार होईल.

१. सदर शासकीय संगणकाचे सुट्टे भाग (मॉनिटर, सी.पी.यु, डॉट मॅक्ट्रीस प्रिंटर, लॅन स्वीचेस, टोनर व युपीएस बॅटरी) मुंबई नगर दिवाणी व सत्र न्यायालय, जुने सचिवालय इमारत, मुंबई— ४०००३२ या आवारात दिनांक ३०.१०.२०२५ ते दिनांक ०७.११.२०२५ कार्यालयीन वेळेत शासकीय सुट्ट्या व्यतिरिक्त ११.०० ते ०३.०० या वेळेत पहावयास मिळेल.

२. लिलाव ज्याचे नावे देण्यात येईल त्याने लिलावाची पूर्ण रक्कम त्याच दिवशी मुंबई नगर दिवाणी व सत्र न्यायालयात रोख विभागात भरावयाची आहे व लिलावामध्ये भाग घेणाऱ्या व्यक्तीस त्याची शासकीय पावती देण्यात येईल. सदरील इसमाने त्याच दिवशी व्यवहार पूर्ण न केल्यास लिलाव रद्द ठरेल.

३. माहिती व तंत्रज्ञान संचालनालय सां.प्र.वि मंत्रालय महाराष्ट्र शासन हयांच्या निर्देशानूसार आजच्या तारखेला घसारा वजा जाता संगणकीय उपकरणांची किंमत किमान रु. १००/— ठरविण्यात आली आहे याची कृपया नोंद घ्यावी.

४. लिलावात ठरलेली कमीत—कमी किंमत न आल्यास लिलाव रद्द करण्याचा पूर्ण अधिकार माननीय प्रधान न्यायाधीश साहेबांना राहील.

५. ज्या ठेकेदाराची महत्तम बोली मान्य होईल त्या यशस्वी ठेकेदाराने सदर संगणक साहित्य स्व:खर्चाने या कार्यालयातून विहीत कागदपत्राची पुर्तता केल्यानंतर व संपूर्ण रक्कम भरल्यानंतर त्याच दिवशी घेऊन जाणे.

६. लिलावात सहभाग घेणाऱ्या प्रत्येक ठेकेदाराला प्रति व्यक्ती रु. २००/— सहभाग शूल्क विना परतावा भरावे लागतील.

७. प्रत्येक ठेकेदाराला स्वत:च्या कंपनीच्या वतीने प्रति कंपनी रु. १०००/— सुरक्षा अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल. यशस्वी ठेकेदाराला सदर सुरक्षा अनामत रक्कम वगळून उर्वरीत रक्कम भरावी लागेल. अयशस्वी ठेकेदारास सदर अनामत रक्कम परत देण्यात येईल.

सोबत — लिलाव करण्यात येणाऱ्या शासकीय संगणकाचे सुट्टे भाग (मॉनिटर, सी.पी.यु, डॉट मॅक्ट्रीस प्रिंटर, लॅन स्वीचेस, टोनर व युपीएस बॅटरी) यांची यादी.

सु.शं.ढाकणे

(सु.शं.ढाकणे)

प्रभारी प्रबंधक

मुंबई नगर दिवाणी व सत्र न्यायालय,

मुंबई ४०० ०३२

| Total Count of Pending Hardware in CR-12 | | |
|---|---|---|
| **Sr. No.** | **Hardware Name** | **Count** |
| 1 | Display Monitor | 43 |
| 2 | Printer | 8 |
| 3 | CPU | 3 |
| 4 | ThinClient CPU | 12 |
| 5 | UPS Battery | 48 |
| 6 | Uniline Batteries | 6 |
| 7 | HP AIO | 1 |
| 8 | LAN Switches | 24 |
| 9 | Polycom HDX7000 Codec | 2 |
| **TOTAL** | | **147** |